Exh. 16/D

In The court of Civil Judge Jr. Dn, Ramtek.

R.C.S No. 70/2025 F.F. 05/03/26

Milind and others.

V/s.

Rajkumar and others.

pursis.

O/Seen.

(Smt. U.C.Vorani)
2nd Jt. CJJD & JMFC Ramtek.

The plaintiff beg to submitt as under
That defendant No. 1, 2 & 4 has filed the Reply & W.S before this Hon'ble Court and They have filed appln for permission to Reply & W.S.

That defendant No. 1, 2 & 4 has not filed W.S & Reply within limitation. They have filed W.S 90 days over. Therefore said appln rejected with cost.

That plaintiff has filed Status quo appln but def. has filed W.S & Reply then said ~~...~~ filed by plaintiff has not pressed Satus quo this pursis.

Hence this pursis.

Ramtek
05/03/26

Plaintiff No. 1

# कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर,

# रामटेक,

Exh. 17/D

नि. दि. दा. क्र. ७०/२०२५

Order-R and R.

(Smt. D.C. Vorani)
2nd Jt. CJJD & JMFC Ramtek.

श्री. मिलिंद पानतावणे व इतर

विरुद्ध

श्री राजकुमार कडबे व इतर

**प्रतिवादी क्र. १, २ व ४ चे वादी यांच्या जाहीर करणे आणि निरंतर मनाई हुकुम मिळण्याबाबत दाव्यास लेखी उत्तर/बयान.**

प्रतिवादी क्र. १, २ व ४ नम्रपणे व विनंतीपुर्वक परिच्छेदा नुसार उत्तर ध्लेखी बयान सादर करतात की,

१) परिच्छेद क्र. १ ला उत्तर - या परिच्छेदातील मजकूर माहितीसाठी नाकारला जातो.

२) परिच्छेद क्र. २ ला उत्तर - हे माहितीसाठी नाकारले जाते की, श्री. दमडू जागो पानतावणे यांनी दिनांक ०४/०४/१९५२ रोजी नो. दस्त क्र. १४५/१९५२ अन्वये मौजा किरणापूर, प.ह.न. २१, तह. रामटेक, जि. नागपूर येथील शेत सर्व्हे क्र. १२६, आराजी १५.१३ एकर, जमा रु ३.९१ पैसे, हक्क भोग मकबुज यापैकी आराजी ६. १८ एकर, जमा रु १५.०० पैसे, हक्क भोग मालीक मकबुज ही शेतजमीन श्री. ताराबंद गुलया हारोडे किराड पाटील, रा. धानला, तह. रामटेक, जि. नागपूर

CIVIL JUDGE (Sr. Dn.) RAMTEK

.२.

यांच्याकडुन नोंदणीकृत विक्रीपत्राच्या आधारे खरेदी केलेली होती. हे माहितीसाठी नाकारले जाते की, श्री. दमडू जागो पानतावणे यांचे नावाने नोंदणीकृत विक्रीपत्राच्या आधारावर महसुल रेकॉर्डवर फेरफार घेण्यात आलेला होता. हे माहितीसाठी नाकारले जाते की, श्री. दमडू जागो पानतावणे यांचा सदरील शेतजमीनीवर कब्जा, वहिवाट व जोत होती. त्यानंतर चेकबंदी / एकत्रीकरणमध्ये शेत सर्व्हे क्र. १२६ या शेतजमीनीला शेत सर्व्हे क्र. १५६ ब हा नंबर महसुल रेकॉर्डवर देण्यात आला होता. हे माहितीसाठी नाकारले जाते की, त्यानंतर पुन्हा पुर्नमोजणीमध्ये शेत सर्व्हे क्र. १५२ ब या शेतजमीनीला नविन शेत सर्व्हे क्र. १३०/२ आराजी हे. २. ५० आर, जमा रु १३. ८७ पैसे, हक्क भोग १ हा नंबर महसुल रेकॉर्डवर देण्यात आलेला आहे. हे माहितीसाठी नाकारले जाते की, त्यामुळे वादी यांची दावा मिळकत शेतजमीन वडीलोपार्जीत आहे. हे माहितीसाठी नाकारले जाते की, श्री. मोतीराम दमडू पानतावणे यांच्या मृत्यूनंतर वादी हे कायदेशीर वारस आहेत. हे माहितीसाठी नाकारले जाते की, वादी हे दावा मिळकत शेत सर्वे क्र. १३०/२ आराजी हे. २. ५० आर, जमा रु १३. ८७ पैसे, हक्क भोग १ या शेतजमीनीचे संयुक्त मालक आहेत आणि वादी यांचा दावा मिळकत शेतजमीनीवर कब्जा, वहिवाट व जोत आहे. दाव्यातील संपत्ती/मालमत्तेचे वर्णन ही माहितीसाठी नाकारला जातो.

३) परिच्छेद क्र. ३ ला उत्तर- हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी यांच्या नावाने मौजा किरणापूर, प.ह.न. २१, तह. रामटेक, जि. नागपूर येथील शेत सर्व्हे क्र. १३०/१ आराजी हे. २. ३२ आर, जमा रु १२.९८ पैसे, हक्क भोग १ हि शेतजमीन महसुल रेकॉर्डवर नमुद आहे. हे म्हणणे चुकीचे आहे की, प्रतिवादी यांचे नाव महसुल रेकॉर्डवर कोणत्या दस्ताऐवजाच्या आधारे दर्ज करण्यात आले आहे याबाबत महसूल रेकॉर्डवर नमुद नाही.

४) परिच्छेद क्र. ४ ला उत्तर- हे म्हणणे बनवटी आहे की, मौजा किरणापूर-चोखाळा गावालगत शेत सर्व्हे क्र. १२४ च्या शिवला लागुन पांथन आहे. हे म्हणणे खोटे आहे की, प्रतिवादी हे शेत सर्व्हे क्र. १०७/२ पर्यंत गावातून येणा-या नाल्याच्या रस्त्याने शेत सर्व्हे क्र. १०७/२ आणि शेत सर्व्हे क्र. १२३ च्या संयुक्त धु-याने शेत सर्व्हे क्र. १२० आणि शेत सर्व्हे क्र. १३०/१ च्या संयुक्त धु-याने शेत सर्व्हे क्र. १३०/१ या शेतजमीनीमध्ये पुर्वीपासुन येणे-जाणे करीत होते. हे म्हणणे बनवटी आहे की, वादी आणि वादी यांचे वडील सन १९५२ ते सन २००० पर्यंत याच रस्त्याने त्यांच्या शेतजमीनीमध्ये येणे-जाणे करीत होते. परंतू प्रतिवादी नं. १ यांनी वादी यांना वरील नमुद केलेल्या रस्त्याने शेतामध्ये येणे-जाणे करण्याकरीता अडथळा निर्माण केला होता. हे म्हणणे खोटे आहे की, वादी यांनी समजविण्याचा प्रयत्न केला असता प्रतिवादी नं. १ हे वादी यांना शिवीगाळ करून जिवे मारहाण करण्याची धमकी देत होते.

५) परिच्छेद क्र. ५ ला उत्तर- या परिच्छेदातील मजकुर संपुर्णतः खोटा व बनावटी असल्याने नाकारत आहे.

६) परिच्छेद क्र. ६ ला उत्तर - या परिच्छेदातील मजकुर दावा नकाशासी संबंधी असल्याने उत्तर देणे गरजेचे नाही.

(७) परिच्छेद क्र. ७ ला उत्तर- हे म्हणणे चुकीचे आहे की, प्रतिवादी नं. १, २ व ४ यांचे वडीलांनी त्यांचे शेतजमीनीमध्ये येण्या-जाण्याकरीता जुना रस्ता असल्यामुळे त्यांनी त्यांचे जिवनकळात कधीही नविन रस्ताची मागणी केली नाही हि बाब प्रतिवादी नं. १, २ व ४ यांना माहीती होती. हे म्हणणे तथाकथित आहे की, प्रतिवादी नं. १ यांचे लगतचे कास्तकार यांचे सोबत पटत नव्हते त्यामुळे प्रतिवादी नं. १ यांनी सन २०२५ साली जुना रस्ता असतांना सुध्दा नविन रस्ताची मागणी करण्याकरता ना. तहसिलदार साहेव, रामटेक यांचे कडे बनावटी व खोटा अर्ज सादर केला. हे म्हणणे चुकीचे आहे की,त्यावेळेस वादी यांनी मा. तहसिलदार साहेब, रामटेक यांचेकडे प्रतिवादी यांना शेतामध्ये येण्या-जाण्याकरता जुना रस्ता असल्यामुळे नविन रस्ता देता येणार नाही

.४.

म्हणून आक्षेप सादर केला होता. हे म्हणणे खोटे आहे की, तसेच वादी यांनी प्रतिवादी यांचा दावा मिळकत शेतजमीनीमधुन रस्ता नसल्याबाबत संपुर्ण दस्ताऐवज दाखल केले होते. हे म्हणणे खोटे आहे की, प्रतिवादी यांचा दावा मिळकत शेतजमीनीथुन रस्ता असल्याबाबत कोणत्याही प्रकारचे दस्ताऐवज दाखल केलेले नाही तसेच मा. तहसिलदार साहेब, रामटेक यांनी आदेश पारीत करण्यापुर्वी शेत सर्व्हे नं. ११९/२ या शेतजमीनीच्या कास्तकाराला कोणत्याही प्रकारचे नोटीस व संधी दिलेली नाही व त्यामुळे मा. तहसिलदार साहेब, रामटेक यांनी सदर शेतजमीनीचे संपुर्ण महसुल रेकॉर्डचे अवलोकन न करता रा.मा.क्र. ८/बी. एन. डी. ५४/२०२४-२०२५ या प्रकरणामध्ये दिनांक २५/०६/२०२५ रोजी पारीत केलेला आदेश कायदेसंगत नसल्याने वादी यांचेवर बंधनकारक नाही. हे म्हणणे खोटे आहे की, त्यामुळे मा. तहसिलदार साहेब, रामटेक यांनी पारीत केलेला आदेश रद्द होण्यास पात्र आहे त्याकारणामुळे प्रतिवादी यांचा शेत सर्व्हे क्र. १३०/२ आणि शेत सर्व्हे क्र. ११९/२ च्या संयुक्त धु-याने उत्तर बाजुने पश्चिम पुर्व धु-याने मागितलेला नविन रस्ता दावा नकाशामध्ये तथदध या मराठी अक्षराने दर्शविलेल्या शेतजमनीच्या धु-याच्या संबधित कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार आणि हितसंबध नाही.

८) परिच्छेद क्र. ८ ला उत्तर - या परिच्छेदात प्रतिवादी क्र. १ विरूध्द केलेले आरोप संपुर्णतः बनावटी व खोटे असल्याने नाकारत आहे

९) परिच्छेद क्र. ९ ला उत्तर - या परिच्छेदातील मजकूर चुकीचा बनावटी असून मान्य नाही. प्रतिवादी नमूद करते की वादी यांना सदरचा दावा दाखल करण्याचे कारण कधीही घडलेले नाही. तसेच सदर दावा हा कालबाह्य असल्याने वादीचा दावा खर्चासह खारीज करण्यात यावा.



CIVIL

१०) परिच्छेद क्र १०, ११,१२ व १३ ला उत्तर - दाव्याचे मुल्यांकन चुकीचे असल्याने नाकारत आहे. ईतर मजकुर रेकॉर्डशी संबंधी असल्याने उत्तर देणे गरजेचे नाही.

११) प्रार्थनेला उत्तर - वादी यांनी महत्वाची वस्तुस्थिती न्यायालयापासून जाणीवपूर्वक लपवून सदर दावा दाखल केला असून अनेक वर्षांपासून वापरात असलेल्या मार्गास उशिरा आक्षेप घेतला आहे. त्यामुळे सदर दावा कायदेशीररित्या ग्राह्य धरता येत नाही. वादी यांची प्रार्थना बेकायदेशीर असल्याने फेटाळण्यात यावी. ही विनंती. मा. तहसिलदार यांनी वस्तुस्थिती व मौका चौकशी अहवालावरुन योग्य आदेश पारित केलेला आहे.

## प्रतिवादी क्र. १,२ व ४ विशेष कथन

प्रतिवादी नमूद करतात की, प्रतिवादी यांच्या शेतजमीनीकडे जाण्यासाठी असलेला मार्ग हा नवीन नसून अनेक वर्षांपासून प्रत्यक्ष वापरात असलेला जुना मार्ग आहे. प्रतिवादी तसेच त्यांच्या पूर्वजांनी सदर मार्गाचा शांततेने, कोणत्याही आक्षेपाशिवाय सातत्याने वापर केलेला आहे. सदर मार्ग हा प्रत्यक्ष शेतीकामासाठी वापरात असून त्याचे अंतर अंदाजे १०० मीटर इतकेच आहे. गावातील व लगतच्या सर्व कास्तकारांना सदर मार्गाची माहिती आहे व तो सर्वमान्य वापरात आहे. त्यामुळे वादींचा सदर मार्ग अस्तित्वात नसल्याचा दावा वस्तुस्थिती विरुद्ध व बनावटी आहे.

संबंधित महसूल अधिकाऱ्यांनी तसेच मा. तहसिलदार व मा. उपविभागीय अधिकारी यांनी कायद्याने निर्धारित प्रक्रियेचे काटेकोरपणे पालन करुनच आदेश पारित केलेले आहेत. आदेश पारित करण्यापूर्वी स्थळ पाहणी, महसूल नोंदींची तपासणी, संबंधित पक्षांना संधी देणे व उपलब्ध कागदपत्रांचे परीक्षण करण्यात आले आहे. त्यामुळे संबंधित आदेश हे कायदेशीर व प्रक्रियेनुसार असल्याने त्यावर आक्षेप घेणे ग्राह्य धरता येणार नाही.

वादी यांनी न्यायालयीन प्रक्रियेचा दुरुपयोग करून प्रतिवादींना त्रास देण्याच्या व त्यांच्या कायदेशीर हक्कास अडथळा निर्माण करण्याच्या उद्देशाने सदर दावा दाखल केलेला आहे. प्रतिवादींच्या शेतीपर्यंत जाण्याचा मार्ग रोखून त्यांना आर्थिक व प्रत्यक्ष शेती नुकसान होईल अशा हेतूने वादी खोटे व बनावटी आरोप करीत आहेत. वादी यांनी महत्वाची वस्तुस्थिती न्यायालयापासून जाणीवपूर्वक लपवून सदर दावा दाखल केला असून अनेक वर्षांपासून वापरात असलेल्या मार्गास उशिरा आक्षेप घेतला आहे. त्यामुळे सदर दावा कायदेशीररित्या ग्राह्य धरता येत नाही.

प्रतिवादी व त्यांचे कुटुंब पूर्णपणे शेती व्यवसायावर अवलंबून असून शेतीकामासाठी सदर मार्गाचा वापर करणे अत्यावश्यक आहे. जर प्रतिवादींना सदर मार्गाचा वापर करण्यास अडथळा निर्माण झाला तर त्यांचे शेतीकाम बंद पडेल व त्यांना आर्थिक व उपजीविकेचे गंभीर नुकसान सहन करावे लागेल. प्रतिवादी अनेक वर्षांपासून सदर मार्गाचा वापर करीत असताना वादींकडून कधीही आक्षेप घेण्यात आलेला नव्हता. अचानक आक्षेप घेणे हे वाद निर्माण करण्याच्या हेतूने व प्रतिवादींना त्रास देण्यासाठी करण्यात आलेले आहे.

वादी यांनी सदर दाव्यामध्ये प्रथमदर्शनी कोणताही ठोस व कायदेशीर हक्क सिद्ध केलेला नाही. सादर केलेली कागदपत्रे व नोंदी या प्रत्यक्ष परिस्थितीशी विसंगत असून त्यावर विश्वास ठेवता येणार नाही. त्यामुळे वादींना कोणत्याही प्रकारचा तात्पुरता किंवा कायमस्वरूपी दिलासा मिळण्याचा अधिकार नाही.प्रतिवादी नमूद करतात की, वादी यांनी न्यायालयाची दिशाभूल करण्याच्या उद्देशाने काही बनावट किंवा चुकीच्या स्वरूपातील कागदपत्रांचा आधार घेतलेला आहे. प्रत्यक्ष महसूल नोंदी व स्थळ परिस्थिती यास अनुरुप नसलेल्या कागदपत्रांवर आधारित दावा ग्राह्य धरता येणार नाही.

CIVIL JUDGE

सदर मार्ग वापरामुळे वादींच्या जमिनीचे कोणतेही प्रत्यक्ष नुकसान होत नाही. त्यामुळे वादींना कोणत्याही प्रकारचे अपूरणीय नुकसान होणार नसल्यामुळे त्यांचा दावा ग्राह्य धरता येत नाही. सोयीचा समतोल पूर्णपणे प्रतिवादींच्या बाजूने आहे कारण मार्ग बंद झाल्यास प्रतिवादींचे शेतीकाम पूर्णपणे बाधित होईल, परंतु मार्ग सुरू राहिल्यास वादींचे कोणतेही वास्तविक नुकसान होणार नाही. जर वादींची मागणी मान्य करुन प्रतिवादींना सदर मार्ग वापरण्यास मनाई केली गेली तर प्रतिवादींचे शेतीकाम ठप्प होईल व त्यांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक व उपजीविकेचे नुकसान होईल, जे कोणत्याही आर्थिक मोबदल्याने भरून निघू शकणार नाही. त्यामुळे प्रतिवादींचे न भरुन निघणारे नुकसान होणार आहे. करीता वादीचा दावा फेटाळण्यात यावा ही विनंती

१).........................

२).........................

३).........................

प्रतिवादी क्र.१, २ व ४

रामटेक

दिनांक - १२/०२/२०२६

प्रतिवादी क्र.१, २ व ४ तर्फे अधिवक्ता

## सत्यापन

मी **राजकुमार बागवान कडबे,** वय ६० वर्षे, धंदा शेती, रा.किरनापुर (खोडगाव), तहसिल रामटेक, जिल्हा नागपूर प्रतिवादी क्र. १ शपथेवर सत्यापन करतो की वरील परिच्छेद क्रं.१ ते ११ मधील मजकुर माझे माहिती नुसार अगदी खरा व सत्य आहे. करीता आज दिनांक १२/०२/२०२६ रोजी रामटेक मुक्कामी सही केली आहे.

रामटेक :

दिनांक: १२/०२/२०२६

मी प्रतिज्ञार्थीला ओळखतो

प्रतिज्ञार्थी

**(ॲड. एम. व्ही. येरपुडे)**

रामटेक

290

AFFIDAVIT

Sworn before me on 12th day of Feb. 2026

Shri/Smt. Rajkumar Baguram Kadbe

Age 60 Kirnapur

is personally known ... me by

Adv. M. V. Yerpude

to whom I personally known.

Supdt.

CIVIL & CRIMINAL COURT

Ramtek

12/2/26

CIVIL JUDGE (Sr. Dn.) RAMTEK

Ramtek

Dt 12/2/2026

Adhar NO.